**स्थायी समिती**

**दाखल विषय – दि. ८/५/२०१८**

**विषय क्रमांक :– ११८ त्वर्य**

मा.सुनिल कांबळे व मा.दिलिप बराटे यांचे दि. ८/५/२०१८ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या विधी सल्लागार पॅनेलवर ॲड्.श्री.विजय लालासाहेब पाटील यांची नियुक्ती करण्यात यावी.

**विषय क्रमांक :– ११९ त्वर्य**

कोथरुड बावधन क्षेत्रिय कार्यालयांतर्गत पुणे मनपाच्या शाळांमध्ये दुरुस्ती कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार अंजनी असोसिएट्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४६,००,१५४/– पेक्षा ७.२०% कमी) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रु.४२,६८,९४२=९२ रकमेपर्यंत काम करुन घेणेस अधिक टेंडर अटी शर्ती मधील बाजार भाववाढ सुत्र व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक आदा/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे क्र. मआ/भवन/५५ दि. ७/५/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १२० त्वर्य**

दि.२१ मे २०१८ ते २५ मे २०१८ या कालावधीत Birmingham City Council यांचेद्वारे आयोजित आरोग्य व पोषण आहार (Smart Food & Nutrition) या विषयावरील परिसंवादास Birmingha England येथे उपस्थित राहून परिसंवादात सहभागी होणेस पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील श्रीमती शीतल तेली–उगले, भा.प्र.से. अतिरिक्त महापालिका आयुक्त, पुणे मनपा व डॉ.अंजली साबणे, सहाय्यक आरोग्य अधिकारी यांना पाठविणेत येत असलेची बाब अवलोकनार्थ सादर केल्याची नोंद घेण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/साप्र/५७ दि. ८/५/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १२१ त्वर्य**

पुणे महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या येवलेवाडी गावाच्या प्रारुप विकास आराखड्यासंदर्भात प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी देण्यासाठी गठीत नियोजन समितीतील शासन नियुक्त सदस्यांना अदा करावयाच्या मानधनाबाबत शासनाच्या दि. ०९.१०.२००९ रोजीच्या पत्रानुसार, मौजे येवलेवाडी गावाच्या एमआरटीपी ॲक्ट १९६६ चे कलम २६(१) अन्वये प्रसिध्द प्रारुप विकास आराखड्याच्या अनुषंगाने कलम २८(२) अन्वये गठीत नियोजन समितीमधील शासन नियुक्त सदस्यांना प्रती बैठकीस र.रु.१०००/– प्रमाणे मानधन अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शअ/५८ दि.८.५.२०१८ चे पत्र.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**